केंद्र शासन अर्थसहाय्यीत निलक्रांती धोरणातंर्गत मत्स्यव्यवसायाचे एकात्मिक विकास व व्यवस्थापन या योजनेस प्रशासकीय मान्यता...

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः मत्स्यवि-२०१८/प्र.क्र.३०/पदुम-१३
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीखः १ मार्च, २०१८

वाचा

१) शासन निर्णय क्रमांकः केंद्र शासनाचे क्र.२७०३५-१९/२०१५-एफवाय (IV) भाग-२, भारत सरकार, कृषि व शेतकरी कल्याण, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विकास विभाग यांचे निलक्रांती धोरणांची मार्गदर्शक तत्वे २०१६.
२) शासन निर्णय क्रमांकः केंद्र शासनाचे क्र.३१०१३/३/२०१७-एफवाय(पी अॅन्ड एम) भारत सरकार, कृषि व शेतकरी कल्याण, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विकास विभाग यांचे दिनांक २८.९.२०१७ चे प्रशासकीय मंजुरी आदेश.
३) शासन निर्णय क्रमांकः केंद्र शासनाचे क्र.३१०१२/३/२०१७-एफवाय(पी अॅन्ड एम) भारत सरकार, कृषि व शेतकरी कल्याण, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विकास विभाग यांचे दिनांक २८.९.२०१७ चे निधी वितरणाचे मंजुरी आदेश.
४) आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.मत्स्य/नि/१११२०६/४२/ २०१७, (भाग-१),दि.१६.११.२०१७ चा प्रस्ताव.
५) कृषि व पदुम विभाग,शासन निर्णय क्र मत्स्यवि-२०१६/प्र.क्र.१५९/पदुम-१३, दिनांक ६.३.२०१७.
६) केंद्र शासनाचे क्र.२७०३५-१९/२०१५-एफवाय (IV), भारत सरकार, कृषि व शेतकरी कल्याण, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विकास विभाग यांचे दिनांक १.१.२०१८ चे सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे आदेश.

प्रस्तावना :-

राज्यातील भूजलाशयीन, सागरी व निमखारेपाणी क्षेत्रातील उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा पुर्ण क्षमतेने वापर करुन शाश्वत पध्दतीने जैविक सुरक्षितता व पर्यावरणीय समतोल राखून मत्स्योत्पादनात वाढ करणे हे केंद्र शासनाच्या निलक्रांती धोरणाचे मुळ उदिष्ट आहे. सदर निलक्रांती योजना राज्यात राबविण्यासाठी पुर्वी कार्यरत ९ योजना सुधारीत बदलासह व नविन अशा २१ योजनांच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाच्या दिनांक ३.३.२०१७ च्या बैठकीत मंत्रिमंडळाने मान्यता प्रदान केली असून शासन निर्णय दिनांक ६.३.२०१७ अन्वये निलंक्रांती योजना राज्यात राबविण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. केंद्र शासनाचे पत्र दिनांक २८.९.२०१७ अन्वये निलक्रांती योजनेतंर्गत मत्स्यव्यवसायाचा एकात्मिक विकास करणे व व्यवस्थापनाद्वारे राज्याच्या मत्स्योत्पादनात दुपटीने वाढ करण्याकरिता ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार निलक्रांती योजनेतंर्गत ११ योजनांना केंद्र शासनाची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर ११ योजनांपैकी प्रथम २ योजना (बर्फ कारखाना व शीतगृह) यापुर्वीच्या असून

त्यास केंद्र हिश्यासाठी लेखाशिर्ष उपलब्ध आहे. मात्र सदर योजना मागील वर्षी ५०% केंद्र शासन सहाय्याची होती. आता सदर योजनेत बदल होऊन निलक्रांती योजनेतंर्गत अनुदान ४०% व लाभार्थी हिस्सा ६०% अशी झाली आहे. ४०% अनुदानामध्ये केंद्र हिस्सा हा ६०% राहणार असून राज्याचा हिस्सा ४०% राहिल. केंद्र शासनाचे दिनांक २८.९.२०१७ च्या पत्रान्वये सदर योजना राबविण्यासाठी केंद्र सहाय्यापोटी प्रथम हप्ता रु.१,६१,८१,२५०/- इतक्या रक्कमेस वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सबब, केंद्र शासनाचे दिनांक २८.९.२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार राज्य शासनाने मंजुरी प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

केंद्र शासनाने निलंक्राती योजनेतंर्गत मत्स्यव्यवसायाचे एकात्मिक विकास व व्यवस्थापनाद्वारे राज्याचे मत्स्योत्पादनात दुपटीने वाढ करण्याकरिता ठरवून दिलेल्या मागदर्शक तत्वानुसार राज्यातील भूजलाशयीन व सागरी क्षेत्रातील खालील योजनांना केंद्र शासनाच्या मंजूर आराखडयाप्रमाणे व ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

मासेमारीनंतर प्रक्रियेतील पायाभूत सुविधांचा विकास या योजनेतंर्गत बर्फ कारखाना व शीतगृहे बांधणे या योजनेस शासन निर्णय दिनांक ६.३.२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे .सदर मान्यतेनुसार सदर योजना ही ५०% केंद्र शासन सहाय्याची होती.त्यास ४०% अनुदान (केंद्र हिस्सा अनुदानाच्या ६०% व राज्य हिस्सा अनुदानाच्या ४०%) इतका बदल करुन मान्यता प्रदान करण्याचे प्रस्तावित आहे. लाभार्थी निवडीचे निकष दिनांक ६.३.२०१७ चे शासन निर्णयानुसार राहतील.

अ.क्र.	योजनेचे नाव	एकक/प्रकल्प किंमत	अनुदानाचे स्वरुप	लाभार्थी निकष
	सागरी मत्स्यव्यवसाय			
१	इंन्सुलेटेड ट्रक कमीत कमी ६ टन क्षमता	रु. १५.०० लक्ष प्रति युनिट	**सर्वसाधारण-** (१) अनुदान-४०% (अ) केंद्र हिस्सा- अनुदानाच्या ६०% (ब) राज्य हिस्सा- अनुदानाच्या ४०% (२) लाभार्थी हिस्सा- ६०% **अनुसूचित जाती/ जमाती महिला व महिलांच्या संस्था-** (१) अनुदान-६०%	१. लाभार्थीने मासे वाहतुकीसाठी जी काही व्यवस्थापन कार्यरत किंमत लागते ती स्वखर्चाने करावी. २. केंद्र शासन मासे वाहतुक करताना कुठल्याही प्रकारची नुकसान भरपाई, कार्यान्वयन, व्यवस्थापन यास जबाबदार राहणार नाही. ३. लाभार्थ्यांनी मासे वाहतुक करतांना खात्री करुन घ्यावी की, सर्व सोयी सुविधा व व्यवस्थापन

			(अ) केंद्र हिस्सा-अनुदानाच्या ६०% (ब) राज्य हिस्सा-अनुदानाच्या ४० टक्के (२)लाभार्थी हिस्सा-४०%	आहे किंवा नाही. ४. लाभार्थ्याने सर्व नियम पाळूनच संबंधित राज्य/केंद्रीय प्रदेश यांच्या अखत्यारितीतच राहून मासे वाहतुकीची व्यवस्थापन प्रक्रिया कार्यरत केली पाहिजे. ५. लाभार्थ्याने मासे वाहतुकीच्या योजनेमध्ये खरेदी केलेल्या इंन्सुलेटेड ट्रकचा फक्त मासेविक्रीसाठी उपयोग करावा. दुसऱ्या कुठल्याही हेतुसाठी वापर करु नये. ६. जर लाभार्थी इतर हेतुसाठी इंन्सुलेटेड ट्रकचा वापर करत असेल तर केंद्र शासन त्याच्या अनुदानाची रक्कम व्याजासहित परत घेईल. ७. केंद्र शासनाच्या कृषी व पदुम विभागाकडून मासे विक्रीसाठी मिळालेल्या अनुदानातून खरेदी केलेल्या इंन्सुलेटेड ट्रकवर सदर योजनेचे नाव, वर्ष दर्शविले पाहिजे.
२	ऑटो रिक्षासह शीतपेटी	रु. २.०० लक्ष प्रति युनिट	**सर्वसाधारण-** (१) अनुदान -४० % (अ) केंद्र हिस्सा-अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा-६०% **अनुसूचित जाती/ जमाती महिला व महिलांच्या संस्था-**	१. लाभार्थीने मासे वाहतुकीसाठी जी काही व्यवस्थापन कार्यरत किंमत लागते ती स्वखर्चाने करावी. २. केंद्र शासन मासे वाहतुक करताना कुठल्याही प्रकारची नुकसान भरपाई, कार्यान्वयन, व्यवस्थापन यास जबाबदार राहणार नाही. ३. लाभार्थ्यांनी मासे वाहतुक करतांना खात्री करुन घ्यावी की,

			(१) अनुदान-६०% (अ) केंद्र हिस्सा- अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा- ४०%	सर्व सोयी सुविधा व व्यवस्थापन आहे किंवा नाही. ४. लाभार्थ्याने सर्व नियम पाळूनच संबंधित राज्य/केंद्रीय प्रदेश यांच्या अखत्यारितीतच राहून मासे वाहतुकीचे व्यवस्थापन प्रक्रिया कार्यरत केली पाहिजे. ५. लाभार्थ्याने मासे वाहतुकीच्या योजनेमध्ये खरेदी केलेली ऑटो रिक्षा हयाचा फक्त मासेविक्रीसाठी उपयोग करावा. दुसऱ्या कुठल्याही हेतुसाठी वापर करु नये. ६. जर लाभार्थी इतर हेतुसाठी ऑटो रिक्षाचा वापर करत असेल तर केंद्र शासन त्याच्या अनुदानाची रक्कम व्याजासहित परत घेईल. ७. केंद्र शासनाच्या कृषी व पदुम विभागाकडून मासे विक्रीसाठी मिळालेल्या अनुदानातून खरेदी केलेल्या ऑटो रिक्षा व शित पेटीवर सदर योजनेचे नाव, वर्ष हे दर्शविले पाहिजे .
३	मोटरसायकलसह शितपेटी	रु. ०.६० लक्ष प्रति युनिट	**सर्वसाधारण-** (१) अनुदान -४० % (अ) केंद्र हिस्सा- अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा- ६०% **अनुसूचित जाती/ जमाती महिला व**	१. लाभार्थीने मासे वाहतुकीसाठी जी काही व्यवस्थापन कार्यरत किंमत लागते ती स्वखर्चाने करावी. २. केंद्र शासन मासे वाहतुक करताना कुठल्याही प्रकारची नुकसान भरपाई, कार्यान्वयन, व्यवस्थापन यास जबाबदार राहणार नाही. ३. लाभार्थ्यांनी मासे वाहतुक

			महिलांच्या संस्था- (१) अनुदान-६०% (अ) केंद्र हिस्सा-अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा-४०%	करतांना खात्री करुन घ्यावी की, सर्व सोयी सुविधा व व्यवस्थापन आहे किंवा नाही ४. लाभार्थ्याने सर्व नियम पाळूनच संबंधित राज्य/केंद्रीय प्रदेश यांच्या अखत्यारितीतच राहून मासे वाहतुकीचे व्यवस्थापन प्रक्रिया कार्यरत केली पाहिजे. ५. लाभार्थ्याने मासे वाहतुकीच्या योजनेमध्ये खरेदी केलेली मोटरसायकलसह शितपेटीचा फक्त मासेविक्रीसाठी उपयोग करावा. दुसऱ्या कुठल्याही हेतुसाठी वापर करु नये. ६. जर लाभार्थी इतर हेतुसाठी मोटरसायकल चा वापर करत असेल तर केंद्र शासन त्याच्या अनुदानाची रक्कम व्याजासहित परत घेईल ७. केंद्र शासनाच्या कृषी व पदुम विभागाकडून मासे विक्रीसाठी मिळालेल्या अनुदानातून खरेदी केलेल्या मोटर सायकल व शितपेटी सदर योजनेचे नाव, वर्ष हे दर्शविले पाहिजे .
४	फिरते मत्स्य विक्री केंद्र	रु.१०.०० लक्ष प्रति युनिट	**सर्वसाधारण-** (१) अनुदान -४० % (अ) केंद्र हिस्सा-अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा-६०% **अनुसूचित जाती/**	१. लाभार्थ्याने परिपूर्ण प्रकल्प अहवाल व कागदपत्र द्यावे तसेच जमिनीकरीता कुठल्याही प्रकारचे अनुदान दिले जाणार नाही. २. फिरते मासे विक्री केंद्राचा खर्च अंदाजित बाजार दराशी मिळताजुळता असावा. ३. बांधकामानंतरचा देखभाल व

			जमाती महिला व महिलांच्या संस्था- (१) अनुदान-६०% (अ) केंद्र हिस्सा-अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा-४०%	व्यवस्थापन खर्च लाभार्थ्यांने स्वखर्चाने करावा. ४. लाभार्थ्याने प्रकल्प अहवाल हा कागदपत्रांच्या पुराव्यासहीत सादर करावा. ५. प्रकल्प प्रस्ताव हा राज्य शासनाच्या स्पष्ट शिफारशीनिशी आला पाहिजे. ६. फिरते मत्स्य विक्री केंद्रासाठी किमान चटाई क्षेत्र १००स्के .फुट असावे. ७. अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/ महिला/बेरोजगार यांना प्राधान्य देण्यात येईल.
५	किरकोळ मासळी विक्री केंद्र व पायाभूत सुविधांचा विकास	रु. ६३.१५ लक्ष	**सर्वसाधारण-** (१) अनुदान -४० % (अ) केंद्र हिस्सा-अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा-६०%	१. लाभार्थीने कागदपत्रांची पूर्तता परिपूर्ण करावी ज्यामध्ये जमिनीवर कुठल्याही प्रकारचे ताबा/ओझे असू नये, आर्थिक संसाधन व आवश्यक मंजूरी/ परवानगी इ. कागदपत्रे बरोबर असावीत. जमिनीसाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देण्यात येणार नाही. २. लाभार्थीने योजनेचे नियोजन, विक्रीकेंद्राची विशिष्ट मांडणी, बाजारातील सुविधा व अंदाजित खर्च हा व्यावसायिकदृष्टया तयार करण्यात यावा. ३. अंदाजित खर्च हा SoRs)Schedule of Rates) च्या अनुषंगाने असावा ज्यामध्ये प्रकल्प क्षेत्र व प्रचलित बाजारदर यांचा समावेश असावा. ४. बांधकामानंतरचे मासेविक्री

				केंद्राचे व्यवस्थापन हे लाभार्थ्याने स्वखर्चाने करावे. ५. प्रकल्प प्रस्ताव लाभार्थ्याने राज्य शासनाच्या स्पष्ट शिफारशीने सादर करावा. ६. सदरील योजनेची अंमलबजावणी ही व्यावसायिकदृष्ट्या योग्य त्या ठिकाणी ठेवून करण्यात यावी.
६	शित साखळी योजनांतर्गत बुटीबोरी येथे फिश ड्रेसिंग सेंटर	रु. १००.०० लक्ष	(१) अनुदान -४० % (अ) केंद्र हिस्सा- अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा- ६०%	१. महामंडळाचा प्रकल्प अहवाल तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण असावा. २. महामंडळाने कागदपत्रांची पूर्तता परिपूर्ण करावी ज्यामध्ये जमिनीवर कुठल्याही प्रकारचे ताबा/ओझे असू नये, आर्थिक संसाधन व आवश्यक मंजूरी/परवानगी इ. कागदपत्रे बरोबर असावीत. जमिनीसाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देण्यात येणार नाही. ३. बांधकामानंतरचे शित साखळी योजनेअंतर्गत बुटीबोरी येथील फ़िश ड्रेसिंग सेंटर व्यवस्थापन हे महामंडळाने स्वखर्चाने करावे. ४. महामंडळाने प्रकल्प अहवाल राज्य शासनाच्या स्पष्ट शिफारशीने सादर करावा. ५. महामंडळाने प्रत्यक्ष राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड यांना प्रकल्प सादर करावे तसेच संबंधित प्रकल्प अहवाल सल्ला व निर्णयाच्या आधारे अनुदान देण्यात येईल.

				६. सदरील योजनेची अंमलबजावणी ही व्यावसायिकदृष्ट्या योग्य त्या ठिकाणी ठेवून करण्यात यावी.
७	शित साखळी योजनांतर्गत अमरावती येथे फिशरीज हब स्थापन	रु. ४५५.०० लक्ष	**सर्वसाधारण-** (१) अनुदान -४० % (अ) केंद्र हिस्सा- अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा- ६०%	१. महामंडळाचा प्रकल्प अहवाल तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण असावा. २. महामंडळाने कागदपत्रांची पूर्तता परिपूर्ण करावी ज्यामध्ये जमीनीवर कुठल्याही प्रकारचे ताबा/ओझे असू नये, आर्थिक संसाधन व आवश्यक मंजूरी/परवानगी इ. कागदपत्रे बरोबर असावीत. जमिनीसाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देण्यात येणार नाही. ३. बांधकामानंतरचे शित साखळी योजनेअंतर्गत अमरावती फिशरीज हब चे व्यवस्थापन महामंडळाने स्वखर्चाने करावे. ४. महामंडळाने प्रकल्प अहवाल राज्य शासनाच्या स्पष्ट शिफारशीने सादर करावे. ५. महामंडळाने प्रत्यक्ष राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड यांना प्रकल्प सादर करावे तसेच संबंधित प्रकल्प अहवाल सल्ला व निर्णयाच्या आधारे अनुदान देण्यात येईल. ६. सदरील योजनेची अंमलबजावणी ही व्यावसायिकदृष्ट्या योग्य त्या ठिकाणी ठेवून करण्यात यावी.

	गोडया पाण्यातील मत्स्यव्यवसाय			
८	बर्फ कारखाना	रु. १०० ००. लक्ष	**सर्वसाधारण-** (१) अनुदान -४० % (अ) केंद्र हिस्सा- अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा- ६०% **अनुसूचित जाती/ जमाती महिला व महिलांच्या संस्था-** (१) अनुदान-६०% (अ) केंद्र हिस्सा- अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा- ४०%	१. लाभार्थ्याने प्रकल्पाची जागा अतिक्रमण विरहित असल्याचे आणि अर्थसहाय्यासह आवश्यक ना हरकत/ परवानगी इत्यादि विस्तृत प्रकल्प प्रस्तावात (DPR) कागदोपत्री पुरावा सादर करणे आवश्यक आहे. जागेसाठी अर्थसहाय्य देय राहणार नाही. २. प्रकल्प किंमत ही अद्ययावत SoRs) Schedule of Rates) नुसार प्रकल्प ठिकाणाच्या सध्याच्या बाजार दरानुसार देय राहील. ३. लाभार्थ्याने प्रकल्पाच्या कार्यरत व देखभालीचा भविष्यकालिन खर्च स्वत: करणार असल्याचे प्रमाणित करण्यात यावे. ४. बर्फ कारखान्यासाठीच्या लाभार्थी निकष (i व ii) बाबतची प्रकल्पाची सविस्तर माहिती लाभार्थ्याने कागदपत्रांच्या स्वयंघोषित पुराव्यासह सादर करावी. ५. प्रस्ताव संबंधित राज्य शासन/ केंद्र शासनाच्या स्पष्ट शिफारशी सादर करणे आवश्यक आहे. ६. लाभार्थीची स्वत:च्या मालकीची जागा असावी. तशी ७/१२ नोंद असणे आवश्यक.

				७. प्रकल्प उभारणीसाठी जागा भाडेतत्वावर असल्यास किमान १५ वर्षाचे करारपत्र असावे.
९	मासळी वाहतुकीसाठी वाहन	रु. १५.०० लक्ष	**सर्वसाधारण-** (१) अनुदान -४० % (अ) केंद्र हिस्सा- अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा- ६०% **अनुसूचित जाती/ जमाती महिला व महिलांच्या संस्था-** (१) अनुदान-६०% (अ) केंद्र हिस्सा- अनुदानाच्या ६० % (ब) राज्य हिस्सा - अनुदानाच्या ४० % (२) लाभार्थी हिस्सा- ४०%	१. लाभार्थीने मासे वाहतुकीसाठी जी काही व्यवस्थापन कार्यरत किंमत लागते ती स्वखर्चाने करावी. २. केंद्र शासन मासे वाहतुक करताना कुठल्याही प्रकारची नुकसान भरपाई, कार्यान्वयन, व्यवस्थापन यास जबाबदार राहणार नाही. ३. लाभार्थ्यांनी मासे वाहतुक करतांना खात्री करुन घ्यावी की, सर्व सोयी सुविधा व व्यवस्थापन आहे किंवा नाही ४. लाभार्थ्याने सर्व नियम पाळूनच संबंधित राज्य/केंद्रीय प्रदेश यांच्या अखत्यारितीतच राहून मासे वाहतुकीचे व्यवस्थापन प्रक्रिया कार्यरत केली पाहिजे. ५. लाभार्थ्याने मासे वाहतुकीच्या योजनेमध्ये खरेदी केलेल्या मासळी वाहतुकीसाठी वाहनाचा फक्त मासेविक्रीसाठी उपयोग करावा. दुसऱ्या कुठल्याही हेतुसाठी वापर करु नये. ६. जर लाभार्थी इतर हेतुसाठी मासळी वाहतुकीसाठी खरेदी केलेल्या वाहनाचा वापर करत असेल तर केंद्र शासन त्याच्या अनुदानाची रक्कम व्याजासहित परत घेईल.

				७. केंद्र शासनाच्या कृषी व पदुम विभागाकडून लाभार्थ्यांना मासे विक्रीसाठी मिळालेल्या अनुदानातून खरेदी केलेल्या मासळी वाहतुक वाहनावर सदर योजनेचे नाव, वर्ष दर्शविले दिसण्यात आले पाहिजे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०११५१८४२३१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran V Kurundkar

Digitally signed by Kiran V Kurundkar
DN: c=IN, o=All India Services, ou=MSRDC Ltd, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f89b7a82db2238fb7337a9a9b8e00b9c1a35b509d1f6850ddcc783bdb12090f, serialNumber=b8691b27012359b3df3a439ebd4db94d6888054fe73fc8f7a75c05e1ec845136, cn=Kiran V Kurundkar
Date: 2018.03.01 15:18:45 +05'30'

(किरण कुरुंदकर)
सचिव (पदुम)

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव
३. मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
५. सचिव, भारत सरकार, कृषि मंत्रालय, (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग), कृषि भवन, नवी दिल्ली.
६. मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव, महाराष्ट्र राज्य,मुंबई
७. अप्पर मुख्य सचिव, (नियोजन), मंत्रालय,मुंबई
८. अप्पर मुख्य सचिव, (वित्त), मंत्रालय, मुंबई
९. सचिव, (सहकार), मंत्रालय,मुंबई
१०. आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य,मुंबई
११. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे

१२. प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/ लातूर/ अमरावती/नागपूर

१३. सर्व सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय

१४. महालेखापाल १/२, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा),मुंबई/नागपूर

१५. अधिदान व लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई

१६. निवासी लेखा अधिकारी, मुंबई

१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१८.सर्व उपकोषागार अधिकारी

१९. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नविन प्रशासन भवन, ५ वा मजला,मंत्रालयासमोर, मुंबई

२०.राष्ट्रीय मत्स्यजिवी सहकारी संघ, नवी दिल्ली, (Fishcopfed),७ सरिता विहार इंस्टीटयुशनल एरिया, नवी दिल्ली-११००७७.

२१. अवर सचिव/कक्ष अधिकारी-१२/१४/१६.

२२.निवडनस्ती